# THE BOMBAY AGRICULTURAL PESTS AND DISEASES ACT, 1947.

(Bom. XLIII of 1947.)

---

## मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४७.

---

### अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

| कलमें. | | पान. |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा व व्याप्ति ... ... ... ... | ८९५ |
| २. | व्याख्या ... ... ... ... | ८९५ |
| ३. | पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग व उपद्रवकारक तण जाहीर करण्याचा आणि त्यांचें निर्मूलन करण्यासाठीं किंवा त्यास प्रतिबंध करण्यासाठीं उपाययोजना करण्याविषयीं निदेश देण्याचा अधिकार ... ... | ८९६ |
| ४. | पोट-कलम (३) अन्वयें अधिसूचना काढल्यावर भोगवटा करणाऱ्याचीं कर्तव्यें ... | ८९६ |
| ५. | कोणत्याहि जमिनीवर किंवा जागेंत प्रवेश करण्याचा निरीक्षकाचा अधिकार ... | ८९६ |
| ६. | प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याविषयीं भोगवटा करणाऱ्यास नोटीस ... ... ... ... | ८९७ |
| ७. | कलम ६ अन्वयें दिलेल्या नोटिशीप्रमाणें वागण्यांत कसूर आणि निरीक्षकाचा उपाय योजण्याचा अधिकार ... ... ... ... | ८९७ |
| ८. | झाडें व रोपटीं नष्ट केल्याबद्दल नुकसानभरपाई ... ... ... | ८९७ |
| ९. | भोगवटा करणाऱ्यानें नष्ट केलेलीं झाडें किंवा रोपटीं यांबद्दल नुकसान-भरपाई ... ... ... ... | ८९८ |
| १०. | नुकसाभरपाईबद्दल दावा करण्याची रीत ... ... ... | ८९८ |
| ११. | न्यायसाहाय्यकाचा निवाडा ; अपील ... ... ... | ८९८ |
| १२. | पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण यांच्या प्रादुर्भावाबद्दल प्रतिवृत्त पाठविण्याचें कांहीं ग्राम अधिकाऱ्यांचें कर्तव्य ... | ८९९ |
| १२-अ. | टोळधाडीचें भय उत्पन्न झालें असतां टोळांचा नाश करण्याचा ज्यांत समावेश होतो अशा प्रतिबंधक व परिहारक उपाययोजना पार पाडण्यासाठीं लोकांनीं साहाय्य करणें व काम करणें ... ... ... | ९०० |

कलम. पान.

१२-ब. टोळधाडीचें भय उत्पन्न झालें असतां वाहनांचें अधिग्रहण करण्याचा अधिकार ... ... ... ... ... ९००

१२-क. कलम १२-ब अन्वयें दिलेल्या आदेशांविरुद्ध अपील ... ... ... ९०३

१२-ड. प्रवेश व तपासणी करण्याचे विशेष अधिकार ... ... ... ९०३

१३. शास्ति ... ... ... ... ... ९०३

१३-अ. आणखी इतर शास्ति ... ... ... ... ९०४

१३-ब. कांहीं अपराधांचा इन्साफ करण्यासंबंधीं विशेष कार्यरीति ... ... ९०४

१४. निरीक्षक व न्यायसाहाय्यक यांची नेमणूक ... ... ... ९०४

१५. दाव्यांस किंवा इतर वैध कारवायांस मनाई ... ... ... ९०४

१६. अधिकार सोंपविणें ... ... ... ... ९०५

१७. नियम ... ... ... ... ९०५

१८. सन १९४१ चा मुंबई अधिनियम १४ रद्द करणें ... ... ... ९०५

## सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३.

[मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४७.]

[ १० डिसेंबर १९४७. ]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम ३३.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम १०.

मुंबई प्रांतांतील पिकें, रोपें किंवा झाडें ह्यांस घातुक अशी कीड, रोपट्यांवरील रोग व उपद्रवकारक तण यांचा उद्भव, प्रसार किंवा पुनरुद्भव ह्यास प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठीं केलेला मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४१ हा रद्द करून पुनः अधिनियमित करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, भारत शासन अधिनियम, १९३५, कलम ९३, पोट-कलम (४) च्या उपबंधामुळें मुंबई प्रांतांतील पिकें, रोपें किंवा झाडें ह्यांस घातुक अशी कीड, रोपट्यांवरील रोग व उपद्रव-कारक तण यांचा उद्भव, प्रसार किंवा पुनरुद्भव ह्यास प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठीं केलेला मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४१ हा रद्द करून पुन्हा अधिनियमित करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४७ असें म्हणावें. लघुसंज्ञा व व्याप्ति.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(१) "न्यायसाहाय्यक" म्हणजे कलम १४ अन्वयें नेमण्यांत आलेला न्यायसाहाय्यक ;

(२) "पिकांवरील कीड" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें अधिसूचनेद्वारें पिकांवरील कीड म्हणून जाहीर केलेली कोणतीहि कीड असा समजावा ;

(३) "निरीक्षक" म्हणजे कलम १४ अन्वयें नेमण्यांत आलेला निरीक्षक ;

(४) "अधिसूचित क्षेत्र" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंत निर्दिष्ट केलेल्या ज्या क्षेत्रांत उक्त कलमाअन्वयें काढलेला जाहीरनामा अंमलांत असेल असें कोणतेंहि क्षेत्र असा समजावा ;

(५) "उपद्रवकारक तण" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें उपद्रवकारक तण म्हणून जाहीर करण्यांत आलेलें कोणतेंहि तण असा समजावा ;

(६) "भोगवटा करणारा" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याहि जमिनीचा किंवा जागेचा भोगवटा करण्याचा हक्क त्या त्या वेळीं ज्यास असेल असा इसम किंवा त्याचा अधिकृत अभिकर्ता किंवा अशा जमिनीचा किंवा जागेचा प्रत्यक्ष भोगवटा करणारा कोणताहि इसम असा समजावा ;

(७) "कीड" म्हणजे कोणतीहि कीड किंवा कणा नसलेला इतर प्राणी ;

(८) "रोपट" या संज्ञेंत कोणत्याहि रोपट्याचीं फळें, पानें, साल, तोड किंवा त्याचा कोणताहि सजीव भाग याचा समावेश होतो; परंतु तींत बियांचा समावेश होत नाहीं:

परंतु, कोणत्याहि विशिष्ट रोपट्याचें बीं हें "रोपटें" या संज्ञेच्या व्याख्येंत समाविष्ट करण्यांत यावें असा, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें निदेश देण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे;

(९) "रोपट्यांवरील रोग" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेद्वारें रोपट्यांवरील रोग म्हणून जाहीर केलेला कोणताहि अलिबसदृश, सूक्ष्मजंतुजन्य, परजीवित्वजन्य किंवा इतर रोग असा समजावा;

(१०) "विहित" म्हणजे कलम १७ अन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग व उपद्रवकारक तण जाहीर करण्याचा आणि त्यांचें निर्मूलन करण्यासाठीं किंवा त्यांस प्रतिबंध करण्यासाठीं उपययोजना करण्याविषयीं निदेश देण्याचा अधिकार.

३. जेव्हां जेव्हां राज्य सरकारास असें दिसून येईल कीं, कोणत्याहि स्थानिक क्षेत्रांत कोणतीहि कीड, रोग किंवा तण कोणत्याहि पिकास, रोपट्यास किंवा झाडास घातुक आहे आणि अशी कीड, रोग किंवा तण यांचें निर्मूलन करण्यासाठीं किंवा त्याचा उद्‌भव, प्रसार किंवा पुनरुद्‌भव, यांस प्रतिबंध करण्यासाठीं उपाययोजना करणें आवश्यक आहे, तेव्हां तेव्हां राज्य सरकारास राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे:—

(१) अशी कीड, रोग किंवा तण हें पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण आहे असें जाहीर करणें;

(२) असा जाहीरनामा ज्या स्थानिक क्षेत्रांत आणि ज्या मुदतीपर्यंत अंमलांत राहील तें स्थानिक क्षेत्र व ती मुदत निर्दिष्ट करणें;

(३) कोणतेंहि रोपटें किंवा झाड एका ठिकाणाहून दुसरीकडे नेण्यास मनाई करणें किंवा त्यावर निर्बंध घालणें; आणि

(४) अशी कीड, रोग किंवा तण यांचें निर्मूलन करण्यासाठीं किंवा त्याचा उद्‌भव, प्रसार किंवा पुनरुद्‌भव यांस प्रतिबंध करण्यासाठीं राज्य सरकारास आवश्यक वाटतील असे प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याविषयीं निदेश देणें—ह्या उपायांत कोणतीहि कीड, रोग किंवा उपद्रवकारक तण किंवा कोणतीहि पिकें, रोपटीं किंवा झाडें नष्ट करणें ह्याचा समावेश होतो.

पोट-कलम ३ अन्वयें अधिसूचना काढल्यावर भोगवटा करणाऱ्याचीं कर्तव्यें.

४. कलम ३ अन्वयें अधिसूचना काढल्यावर, अधिसूचित क्षेत्रांतील प्रत्येक भोगवटा करणाऱ्यानें अशा अधिसूचनेंत सांगितलेले प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजिले पाहिजेत.

कोणत्याहि जमिनीवर किंवा जागेंत प्रवेश करण्याचा निरीक्षकाचा अधिकार.

५. कोणत्याहि निरीक्षकास, विहित केलेली नोटीस दिल्यानंतर, पुढील गोष्टींची खात्री करून घेण्याकरितां अधिसूचित क्षेत्रांतील कोणत्याहि जमिनीवर किंवा जागेंत प्रवेश करण्याचा अधिकार आहे; त्या गोष्टी अशा—

(१) अशा जमिनीवर किंवा जागेवर कोणतीहि पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण आहे किंवा कसें; आणि

(२) कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंत सांगितलेले प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्यांत आले आहेत किंवा कसें.

६. (१) जर कलम ५ अन्वयें कोणत्याहि जमिनीची किंवा जागेची तपासणी केल्यानंतर निरीक्षकास असें आढळून येईल कीं, अशा जमिनीवर किंवा जागेवर कोणतीहि पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण आहे, किंवा कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंत सांगितलेले प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्यांत आलेले नाहींत तर, निरीक्षकास राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून अशा जमिनीचा किंवा जागेचा भोगवटा करणाऱ्या इसमास लेखी नोटीस देऊन, अशा नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या मुदतींत असे प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याविषयीं त्यास फर्माविण्याचा अधिकार आहे. प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याविषयीं भोगवटा करणाऱ्यास नोटीस.

(२) भोगवटा करणाऱ्यास पोट-कलम (१) अन्वयें त्याजवर नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आंत, कलेक्टरकडे किंवा कलेक्टर याबाबत नेमील अशा इतर अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वयें अपील आल्यावर, यथास्थिति कलेक्टरास किंवा इतर अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या नोटिशींत निर्दिष्ट केलेली मुदत वाढविण्याचा अधिकार आहे. आणि भोगवटा करणाऱ्यास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, कलेक्टरनें किंवा अशा अधिकाऱ्यानें अपिलावर आपणास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(४) पोट-कलम (३) अन्वयें दिलेला प्रत्येक आदेश अखेरचा असेल.

७. (१) कलम ६, पोट-कलम (१) अन्वयें ज्यावर नोटीस बजाविण्यांत आली असेल असा भोगवटा करणारा इसम अशा नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या मुदतींत त्याप्रमाणें वागणार नाहीं तर, किंवा कलम ६, पोट-कलम (२) अन्वयें अपील दाखल करण्यांत आलें असल्यास अशा अपिलावर दिलेल्या आदेशाप्रमाणें वागणार नाहीं तर, निरीक्षकास अशा नोटिशींत किंवा आदेशांत सांगितलेले प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याचा अधिकार आहे. कलम ६ अन्वयें दिलेल्या नोटिशीप्रमाणें वागण्यांत कसूर आणि निरीक्षकाचा उपाय योजण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वयें कोणतेहि प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजिल्यामुळें झालेला खर्च भोगवटा करणाऱ्यानें दिला पाहिजे. आणि तो त्याजकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करतां येईल.

(३) अशा कोणत्याहि भोगवटा करणाऱ्या इसमास, त्याजकडून अशा खर्चाची प्रथम मागणी करण्यांत आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, पुढील मुद्यांवर कलेक्टरकडे किंवा कलेक्टर याबाबत नेमील अशा इतर अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अधिकार आहे तो मुद्दा असा:—

(१) अशा खर्चात मजुरी, सामान किंवा हत्यारांचा वापर याबाबत झालेल्या खर्चाव्यतिरिक्त इतर बाबींबद्दल आकारांचा समावेश करण्यांत आला आहे; अथवा

(२) मजुरी किंवा सामान किंवा हत्यारांचा वापर याबाबत केलेले आकार हे वाजवीपेक्षां अधिक आकारण्यांत आले आहेत.

(४) पोट-कलम (३) अन्वयें केलेलें अपील मिळाल्यावर यथास्थिति कलेक्टरनें किंवा इतर अधिकाऱ्यानें भोगवटा करणाऱ्यास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, अपिलावर त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(५) पोट-कलम (४) अन्वयें दिलेला प्रत्येक आदेश अखेरचा असेल.

८. (१) कलम ७, पोट-कलम (१) अन्वयें कोणतेहि प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजतांना जर निरीक्षक— झाडें व रोपटी नष्ट केल्याबद्दल नुकसानभरपाई.

(अ) पिकांवरील कीड किंवा रोपट्यांवरील रोग यांची बाधा झालेलें कोणतेंहि झाड, अथवा

(ब) ज्यापैकीं कांहीं किंवा सर्व रोपट्यांना पिकांवरील कीड किंवा रोपट्यांवरील रोग यांची बाधा झाली असेल आणि जीं इतकीं जवळ जवळ वाढलीं असतील कीं, त्यांपैकीं प्रत्येकांवर वेगवेगळा उपाय करणें व्यवहार्य नसेल अशीं कोणतीहि रोपटीं, अथवा

(क) जीं रोपटीं किंवा झाडें यांना त्यावेळीं पिकांवरील कीड किंवा रोपट्यांवरील रोग यांची बाधा झालेली नसेल परंतु निरीक्षकाच्या मतें त्यास अशी बाधा होण्याचा संभव असेल अशीं कोणतींहि रोपटीं किंवा झाडें,

नष्ट करील किंवा करवील तर, निरीक्षकानें, ज्या जमिनीवर किंवा जागेवर अशीं झाडें किंवा रोपटीं वाढलीं असतील त्या जमिनीचा किंवा जागेचा भोगवटा करणाऱ्या इसमास नोटीस दिली पाहिजे, आणि अशा नोटिशींत नष्ट केलेल्या झाडांचा किंवा रोपट्यांचा तपशील आणि त्यानें अंदाज केलेली त्यांची किंमत नमूद केली पाहिजे.

(२) जेव्हां पोट-कलम (१) अन्वयें कोणतेंहि झाड किंवा रोपटें नष्ट करण्यांत येईल तेव्हां, भोगवटा करणाऱ्यास कलम ११ मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें ठरविण्यांत आलेली नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

भोगवटा करणाऱ्यानें नष्ट केलेलीं झाडें किंवा रोपटीं याबद्दल नुकसानभरपाई.

९. कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेअन्वयें किंवा कलम ६ पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या नोटिशीअन्वयें जे कोणतेहि प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्याविषयीं निदेश देण्यांत आला असेल ते योजतांना जर भोगवटा करणारा अशा निदेशानुसार कोणतेंहि झाड किंवा रोपटें नष्ट करील तर, त्यास असें झाड किंवा रोपटें निरीक्षकाकडून नष्ट करण्यांत आलें असतां कलम ८ अन्वयें जी नुकसानभरपाई मिळाली असती ती नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

नुकसानभरपाईबद्दल दावा करण्याची रीत.

१०. नुकसानभरपाईबद्दलचा प्रत्येक दावा—

(१) जर तो कलम ८ अन्वयें करण्यांत आला असेल तर, अशा कलमाचें पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या नोटिशीच्या तारखेपासून, अथवा

(२) जर तो कलम ९ अन्वयें करण्यांत आला असेल तर, यथास्थिति झाड किंवा रोपटें नष्ट केल्याच्या तारखेपासून

एक महिन्याच्या आंत न्यायसाहाय्यकाकडे (असेसर) लेखी करण्यांत आला पाहिजे.

न्यायसाहाय्यकाचा निवाडा; अपील.

११. (१) कलम १० अन्वयें कोणताहि दावा आल्यावर न्यायसाहाय्यकानें पोट-कलम (२)च्या उपबंधांस अधीन राहून आणि विहित केलेल्या रीतीनें चौकशी केल्यानंतर व त्यास योग्य वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर, ह्या अधिनियमाच्या उपबंधांन्वयें भोगवटा करणाऱ्यास द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम ठरविली पाहिजे व अशी रक्कम त्यास देण्याबाबत निवाडा दिला पाहिजे.

(२) नुकसानभरपाईची रक्कम ही—

(अ) कलम ८, पोट-कलम (१), कंडिका (अ) मध्यें ज्या प्रकारच्या झाडांचा उल्लेख केला आहे त्या प्रकारच्या नष्ट केलेल्या प्रत्येक झाडाबद्दल, अशा झाडाच्या किंमतीच्या निम्म्यापेक्षां अधिक असतां कामा नये;

(ब) कलम ८, पोट-कलम (१), कंडिका (ब) मध्यें ज्या प्रकारच्या रोपट्यांचा उल्लेख केला आहे त्या प्रकारच्या नष्ट केलेल्या प्रत्येक रोपट्याबद्दल, त्याच्या किंमतीच्या तीन-पंचमांशापेक्षां अधिक असतां कामा नये; आणि

(क) कलम ८, पोट-कलम (१), कंडिका (क) मध्यें ज्या प्रकारच्या झाडांचा किंवा रोपट्यांचा उल्लेख केला आहे त्या प्रकारच्या नष्ट केलेल्या प्रत्येक रोपट्याबद्दल किंवा झाडाबद्दल, त्याच्या पूर्ण किंमतीइतकी असली पाहिजे:

परंतु,—

(१) नष्ट केलेलें कोणतेंहि उपद्रवकारक तण.

(२) कोणत्याहि पिकांवरील कीड किंवा रोपट्यांवरील रोग यांचें निर्मूलन करण्यासाठीं किंवा त्याचा उद्‌भव किंवा पुनरुद्भव यास प्रतिबंध करण्यासाठीं नष्ट करण्यांत आलेलें कोणतेंहि कापशीचें रोपटें,

(३) कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंत सांगितलेले प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजण्यांत भोगवटा करणाऱ्यानें हयगय केल्यामुळें निरीक्षकाच्या मतें ज्या झाडास किंवा रोपट्यास कोणत्याहि पिकांवरील कीड किंवा रोपट्यांवरील रोग यांची बाधा झाली असेल अशा झाडांचा किंवा रोपट्यांचा नाश,

यांबद्दल कोणतीहि नुकसानभरपाई मिळणार नाहीं.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरितां, "किंमत" या संज्ञेचा अर्थ, एखादें झाड किंवा रोपटें नष्ट करतेंवेळीं त्याची जी किंमत असेल ती किंमत असा समजावा.

(३) कलम ७, पोट-कलम (१) अन्वयें प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजतांना झालेल्या खर्चाबद्दल भोगवटा करणाऱ्याकडून कोणतीहि रक्कम येणें असेल तर, आवश्यक असेल त्याप्रमाणें त्यास दिलेल्या नुकसानभरपाईच्या संबंध रकमेची किंवा तिच्या भागाची वजावट त्याजकडून येणें असलेल्या खर्चाच्या रकमेंतून करण्यांत आली पाहिजे.

(४) न्यायसाहाय्यकानें दिलेल्या प्रत्येक निवाड्याची प्रत अशी नुकसानभरपाई ज्यास देण्यांत आली असेल त्या भोगवटा करणाऱ्याकडे आणि संबंधित अधिसूचित क्षेत्राच्या निरीक्षकाकडे पाठविण्यांत आली पाहिजे.

(५) यथास्थिति भोगवटा करणाऱ्यास किंवा निरीक्षकास पोट-कलम (४) अन्वयें निवाड्याची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आंत, निवाड्याविरुद्ध कलेक्टरकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(६) पोट-कलम (५) अन्वयें अपील आल्यावर, कलेक्टरनें, भोगवटा करणाऱ्यास व निरीक्षकास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, अपिलावर त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(७) पोट-कलम (६) अन्वयें दिलेला प्रत्येक आदेश अखेरचा असेल.

पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण यांच्या प्रादुर्भावाबद्दल प्रतिवृत्त पाठविण्याचें कांहीं ग्राम-अधिकाऱ्यांचें कर्तव्य.

१२. (१) जर अधिसूचित क्षेत्रांशीं संलग्न असलेल्या कोणत्याहि गांवांत कोणतीहि पिकांवरील कीड, रोपट्यांवरील रोग किंवा उपद्रवकारक तण उद्‌भवेल तर, अशा गांवाच्या ग्राम-अधिकाऱ्यांनीं अशा गोष्टीचें प्रतिवृत्त कलेक्टरकडे किंवा राज्य सरकार याबाबत नेमील अशा इतर अधिकाऱ्याकडे तावडतोब पाठविलें पाहिज.

(२) यथास्थिति कलेक्टरनें किंवा अशा इतर अधिकाऱ्यानें असें प्रतिवृत्त मिळाल्यावर आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर तें प्रतिवृत्त आपल्या शेऱ्यानिशीं राज्य सरकारकडे पाठविलें पाहिजे.

टोळधाडीचें भय उत्पन्न झालें असतां टोळांचा नाश करण्याचा ज्यांत समावेश होतो अशा प्रतिबंधक व परिहारक उपाययोजना पार पाडण्यासाठीं लोकांनीं साहाय्य करणें व काम करणें

१२-अ. (१) कलम ३ अन्वयें ज्या कोणत्याहि अधिसूचित क्षेत्रांत टोळ हे पिकांवरील कीड म्हणून जाहीर करण्यांत आलें असेल त्या क्षेत्रावर जेव्हां टोळधाड आली असेल किंवा येण्याचा धोका असेल तेव्हां, कलेक्टरास किंवा याबाबत त्यानें नेमलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास, टोळांविरुद्ध प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजणें सुकर व्हावें म्हणून यांत यापुढें निर्दिष्ट केलेल्या रीतीनें प्रसिद्ध केलेल्या घोषणेद्वारें पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे; म्हणजे---

(अ) १४ वर्षांखालीं व ६० वर्षांच्यावर नसलेल्या व अधिसूचित क्षेत्रांत राहत असलेल्या सर्व पुरुषांस प्रतिबंधक किंवा परिहारक उपाययोजना पार पाडण्याचा आणि टोळांचा नाश करण्याच्या कामीं शक्य तें सर्व साहाय्य करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे :

परंतु, जर एखादा इसम शारीरिक दौर्बल्यामुळें साहाय्य करण्यास असमर्थ असेल किंवा तो ज्या ठिकाणी त्याचें साहाय्य आवश्यक असेल त्या ठिकाणापासून ५ मैलांपेक्षां अधिक अंतरावर राहत असेल तर, त्यास ह्या कंडिकेअन्वयें साहाय्य करण्याविषयीं फर्मावितां कामा नये.

(ब) १८ वर्षांखालीं व ६० वर्षांच्यावर नसलेल्या व अधिसूचित क्षेत्रांत राहत असलेल्या सर्व किंवा कोणत्याहि पुरुषांस घोषणेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा वेळीं व अशा ठिकाणीं व अशा प्राधिकाऱ्यासमोर जातीनें हजर राहण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे व तसेंच अशा घोषणेनुसार ज्या प्राधिकाऱ्यासमोर ते जातीनें हजर राहिले असतील तो प्राधिकारी सांगेल तें काम तो सांगेल त्या मुदतीपर्यंत करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे :

परंतु, जर एखादा इसम शारीरिक दौर्बल्यामुळें असें काम करण्यास असमर्थ असेल तर, त्यास ह्या कंडिकेअन्वयें काम करण्याविषयीं फर्मावितां कामा नये.

(२) जेव्हां पोट-कलम (१), कंडिका (अ) अन्वयें साहाय्य करण्याविषयीं कोणत्याहि इसमास फर्माविण्यांत आलें असेल तेव्हां, कलेक्टरास किंवा नेमलेल्या अधिकाऱ्यास किंवा कलेक्टरनें याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास कोणतीहि विशिष्ट गोष्ट करण्याविषयीं किंवा न करण्याविषयीं अशा इसमास निदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (१), कंडिका (ब) अन्वयें काम करण्याविषयीं ज्यास फर्माविण्यांत आलें असेल अशा इसमास अशा कामाच्या मोबदल्यांत विहित करण्यांत येईल अशी रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

(४) पोट-कलम (१) अन्वयें केलेली घोषणा शहरांत किंवा गांवांत दवंडी पिटवून आणि त्याची प्रत, यथास्थिति शहरांतील किंवा गांवांतील चावडीवर किंवा इतर एखाद्या सार्वजनिक इमारतीवर किंवा जागेवर चिकटवून प्रसिद्ध केली पाहिजे; आणि अशी घोषणा निर्दिष्ट केलेल्या दिवशीं योग्य रीतीनें प्रसिद्ध करण्यांत आली होती, या अर्थाचें कलेक्टरनें किंवा घोषणा करणाऱ्या अधिकाऱ्यानें केलेलें लेखी निवेदन हें, ह्या कलमांत सांगितलेल्या आवश्यक गोष्टींचें पालन करण्यांत आलें होतें आणि घोषणा अशा दिवशीं प्रसिद्ध करण्यांत आली होती यांविषयीं निर्णायक पुरावा असेल.

(५) पोट-कलम (१) अन्वयें केलेली घोषणा ही, ती केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतर--अशी मुदत ती संपण्यापूर्वी राज्य सरकारनें जाहीर नोटिशीद्वारें तीन महिन्यांपेक्षां अधिक नाहीं अशा आणखी मुदतीपर्यंत वाढविली नसल्यास,--अंमलांत असण्याचें बंद होईल. पोट-कलम (४) चे उपबंध हे, योग्य त्या फेरफारांसह, अशी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत लागू होतील.

टोळधाडीचें भय उत्पन्न झालें असतां

१२-ब. (१) कलम ३ अन्वयें ज्या कोणत्याहि अधिसूचित क्षेत्रांत टोळ हे पिकांवरील कीड म्हणून जाहीर करण्यांत आलें असेल त्या क्षेत्रावर जेव्हां टोळधाड आली असेल किंवा येण्याचा धोका असेल तेव्हां, कलेक्टरास किंवा याबाबत त्यानें नेमलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास, टोळांविरुद्ध प्रतिबंधक किंवा परिहारक उपाय योजणें सुकर व्हावें म्हणून लेखी आदेश देऊन कोणत्याहि

वाहनाचें अधिग्रहण करण्याचा अधिकार आहे. तसेंच त्यास अशा अधिग्रहणासंबंधीं आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे इतर आदेश देण्याचा अधिकार* आहे. त्यानंतर, ह्या कलमाअन्वयें ज्या कोणत्याहि वाहनाचें अधिग्रहण करण्यांत आलें असेल त्याचा उपयोग किंवा व्यवस्था वाहनाचें अधिग्रहण करणाऱ्या अधिकाऱ्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशा रीतीनें करतां येईल. वाहनाचें अधिग्रहण करण्याचा अधिकार.

(२) (१) पोट-कलम (१) अन्वयें दिलेला प्रत्येक आदेश हा,—

(अ) जर तो संस्थेस किंवा पेढीस लागू असेल तर, व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ हिच्या पहिल्या अनुसूचींतील, यथास्थिति आदेश २९, नियम २ किंवा आदेश ३०, नियम ३ यांत आज्ञापत्र बजावण्याविषयीं ज्या रीतीची तरतूद केली असेल त्या रीतीनें बजाविण्यांत आला पाहिजे;

(ब) जर तो संस्था किंवा पेढी याव्यतिरिक्त इतर मालकास व्यक्तिशः लागू असेल तर, अशा मालकावर पुढील रीतीनें बजाविण्यांत आला पाहिजे :—

(१) त्यास असा आदेश प्रत्यक्ष देऊन किंवा देण्यास काढून, अथवा

(२) पोस्टानें पाठवून, अथवा

(३) जर असा मालक सांपडत नसेल तर, अशा आदेशाची अधिकृत प्रत त्याच्या कुटुंबांतील एखाद्या प्रौढ पुरुषाजवळ ठेवून किंवा अशी प्रत ज्या जागेंत तो शेवटीं राहत असल्याचें किंवा धंदा करीत असल्याचें किंवा फायद्यासाठीं काम करीत असल्याचें माहीत असेल त्या जागेच्या एखाद्या ठळक भागावर चिकटवून;

(क) जर अधिग्रहण करावयाच्या वाहनाच्या मालकीविषयीं विवाद असेल तर, राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आला पाहिजे.

(२) जेव्हां एखाद्या इसमास किंवा मालकास पोट-कलम (१) अनुसार दिलेल्या आदेशाची योग्य रीतीनें खबर देण्यांत आली होती किंवा नाहीं याविषयीं प्रश्न उपस्थित होईल तेव्हां, ह्या पोट-कलमाअन्वयें करणें आवश्यक असलेल्या गोष्टींचें पालन करण्यांत आलें होतें ही गोष्ट त्यास अशा रीतीनें खबर देण्यांत आली होती याविषयीं निर्णायक पुरावा असेल; परंतु अशा आवश्यक गोष्टींचें पालन करण्यांत आलें नाहीं ही गोष्ट त्यास अशा रीतीनें खबर देण्यांत आली होती हें इतर मार्गानें सिद्ध करण्यास आड येणार नाहीं किंवा अशा आदेशाच्या वैधतेस त्यामुळें बाध येणार नाहीं.

(३) जर वाहनाच्या मालकानें, पोट-कलम (२) मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें आदेश बजावण्यांत आल्यानंतर असें वाहन आदेशांत सांगितलेल्या अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या कबजांत दिलें नाहीं तर, यथास्थिति अशा अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास असें वाहन त्या त्या वेळीं ज्या इसमाच्या कबजांत असेल त्या इसमाकडून तें घेण्याचा अधिकार आहे.

(४) कोणत्याहि वाहनाच्या कोणत्याहि मालकानें किंवा तें ज्याच्या कबजांत असेल अशा कोणत्याहि इसमानें ह्या कलमाअन्वयें आदेश बजावण्यांत किंवा प्रसिद्ध करण्यांत आल्यानंतर, अशा वाहनाचा कोणताहि भाग, टायर, ट्यूब किंवा इतर कोणतेंहि उपसाधन (ॲक्सेसरी) काढून नेतां किंवा काढून नेण्यास परवानगी देतां कामा नये किंवा अशा वाहनाची उपयुक्तता कमी व्हावी म्हणून कोणत्याहि प्रकारें वाहनाची नासधूस करतां किंवा होऊं देतां कामा नये.

(५) जेव्हां ह्या कलमाअन्वयें कोणत्याहि वाहनाचें अधिग्रहण करण्यांत आलें असेल तेव्हां, मालकास नुकसानभरपाई देण्यांत आली पाहिजे; अशी नुकसानभरपाईची रक्कम असा मालक व वाहनाचें अधिग्रहण करणारा अधिकारी आपसांत कबुलायत करून ठरवतील त्या रकमेइतकी असेल आणि अशी कबुलायत घडून न आल्यास कलेक्टर ठरवील त्या रकमेइतकी असेल.

नुकसानभरपाईची रक्कम ठरवितांना, कलेक्टरनें वाहनाचें अधिग्रहण करण्यांत आल्यामुळें मालकाचें झालेलें नुकसान व तसेंच वाहनाचा नमुना, बनावट प्रकार, वर्ग आणि अधिग्रहण करण्याच्या वेळीं त्याची असलेली स्थिति या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत :

परंतु, मालकास द्यावयाच्या नुकसानभरपाईचा कमाल दर हा, अधिग्रहणाच्या मुदतींत त्या जिल्ह्यांत अशा वाहनांच्या भाड्याचे जे दर चालू असतील ते विचारांत घेऊन, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें वेळोवेळीं ठरवील अशा दैनिक दरापेक्षां अधिक असतां कामा नये.

नुकसानभरपाई ठरविण्याबाबतचा ह्या पोट-कलमाअन्वयें दिलेला आदेश हा, पोट-कलम (२) मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें बजावण्यांत आला पाहिजे.

(६) कोणत्याहि वाहनाचें ज्या अधिकाऱ्यानें अधिग्रहण केलें असेल त्यास कोणत्याहि वेळीं असें वाहन अधिग्रहणांतून मुक्त करण्याचा अधिकार आहे आणि तसें करण्याचें ठरविण्यांत येईल तेव्हां पोट-कलम (२) मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें मालकावर लेखी नोटीस बजावून तींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी व अशा जागेंतून व अशा इसमाकडून वाहन आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं त्यास कळविण्यांत आलें पाहिजे.

(७) अशी नोटीस बजावण्यांत येईल तेव्हां, अशा तारखेपासून, वाहनाचें अधिग्रहण करण्याच्या संबंधांत नुकसानभरपाई देण्याबद्दल किंवा इतर कोणत्याहि प्रकारची रक्कम देण्याबद्दल आणखी कोणतीहि जबाबदारी प्राप्त होणार नाहीं :

परंतु, वाहनाचें अधिग्रहण ज्यानें केलें असेल त्या अधिकाऱ्यास, अधिग्रहणाच्या मुदतींत वाहनाची कोणतीहि विशेष नासधूस झाल्याबद्दल नुकसानभरपाईदाखल कलेक्टर ठरवील अशी आणखी रक्कम देण्याचा अधिकार आहे.

(८) असें वाहन मालकाच्या किंवा त्याच्या अधिकृत अभिकर्त्याच्या स्वाधीन केल्यानें, अशा वाहनाच्या कबजाबाबत ज्याला वैध हक्क असेल अशा इसमाच्या तें स्वाधीन करण्याविषयीं राज्य सरकारची जी कोणतीहि जबाबदारी असेल तिच्यांतून त्याची पूर्णपणें मुक्तता झाली आहे असें समजलें पाहिजे ; परंतु त्यामुळें ज्या इसमास वाहनाचा कबजा देण्यांत आला असेल त्या इसमाविरुद्ध, अशा वाहनाच्या बाबतींत इतर कोणत्याहि इसमास योग्य वैध इलाज करून जो कोणताहि हक्क बजावतां येईल त्यास बाध येणार नाहीं.

(९) जर निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी मालक असें वाहन आपल्या ताब्यांत घेण्यास चुकेल तर, वाहन अधिग्रहणांतून मुक्त करण्याविषयींचा आदेश ज्या अधिकाऱ्यानें दिला असेल त्या अधिकाऱ्यास पोट-कलम (१०) मध्यें तरतूद केलेल्या रीतीनें त्याची त्यानंतर विल्हेवाट लावतां येईल :

परंतु, अशा अधिकाऱ्यास मालकाला त्यास योग्य वाटेल अशी मुदतवाढ देतां येईल; मात्र अशा वाढविलेल्या मुदतीबद्दल कोणतीहि नुकसानभरपाई किंवा इतर रक्कम देण्याची जबाबदारी असणार नाहीं.

(१०) पोट-कलम (९) अन्वयें वाहनाची विल्हेवाट जाहीर लिलांवानें व मालकाच्या जबाबदारीवर करण्यांत येईल आणि निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी मालकानें वाहन ताब्यांत न घेतल्यामुळें वाहनाची अधिग्रहणांतून मुक्तता करणाऱ्या अधिकाऱ्यास जो कोणताहि खर्च झाला असेल तो विक्री करून आलेल्या रकमेंतून वजा करून बाकीची रक्कम मालकास दिली पाहिजे.

(११) कलेक्टरास किंवा त्यानें याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्यास, ह्या कलमाअन्वयें कोणत्याहि वाहनाचें अधिग्रहण करण्याच्या उद्देशानें किंवा असें अधिग्रहण करण्याबद्दल द्यावयाच्या नुकसान-भरपाईची रक्कम ठरविण्याच्या उद्देशानें लेखी आदेश देऊन पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(अ) कोणत्याहि इसमास वाहनासंबंधीं निर्दिष्ट करण्यांत येईल अशी त्यास असलेली माहिती आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकाऱ्याला पुरविण्या-विषयीं फर्माविणें ;

(ब) मालकानें किंवा वाहन कबजांत असलेल्या इसमानें आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशी मुदत संपेपर्यंत त्याच्या परवानगीवांचून अशा वाहनाची विल्हेवाट लावतां कामा नये किंवा तें ज्या जागीं किंवा ठिकाणीं ठेवलें असेल तेथून तें काढून नेतां कामा नये असा निदेश देणें.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरितां—

(अ) जें वाहन भाडेखरेदी करारानें घेतलें असेल त्या वाहनाच्या संबंधांत "मालक" या संज्ञेंत कराराअन्वयें वाहन ज्याच्या कबजांत असेल त्या इसमाचा समावेश होतो ;

(ब) "वाहन" या संज्ञेचा अर्थ, ज्याचा माणसांची किंवा मालाची रस्त्यांवरून नेआण करण्यासाठीं उपयोग केला जातो किंवा करतां येणें शक्य आहे असें कोणतेंहि वाहन असा समजावा—मग तें यांत्रिक शक्तीनें चालविण्यांत येवो अगर न येवो.

१२-क. (१) कलम १२-ब अन्वयें दिलेल्या प्रत्येक आदेशावर, जर तो कलेक्टरपेक्षां कमी दर्जाच्या कोणत्याहि अधिकाऱ्यानें दिला असेल तर, कलेक्टरकडे अपील करतां येईल; आणि जर तो कलेक्टरनें दिला असेल तर, विहित प्राधिकाऱ्याकडे अपील करतां येईल. वरील आदेशांत वाहनांचें अधिग्रहण केल्याबद्दल द्यावयाची नुकसानभरपाई ठरविण्याबाबत दिलेल्या आदेशाचा समावेश होतो. कलम १२-ब अन्वयें दिलेल्या आदेशांविरुद्ध अपील.

(२) असें अपील, ज्या आदेशावर अपील करण्यांत आलें तो आदेश अपील करणारावर बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत दाखल केलें पाहिजे.

(३) अशा अपिलांत दिलेला प्रत्येक आदेश अखेरचा असेल.

१२-ड. ह्या अधिनियमाअन्वयें अन्य रीतीनें दिलेल्या कोणत्याहि अधिकारास बाध येऊं न देतां, राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याहि इसमास, कलम १२-अ किंवा १२-ब अन्वयें कोणताहि आदेश देण्यांत यावा किंवा कसें हें ठरविण्याकरितां आणि असा आदेश द्यावयाचा असल्यास तो कोणत्या रीतीनें द्यावा हें निश्चित करण्याकरितां किंवा उक्त कलमाअन्वयें दिलेल्या कोणत्याहि आदेशाचें पालन व्हावें म्हणून कोणत्याहि जागेंत किंवा वाहनांत प्रवेश करून त्याची तपासणी करण्याचा अधिकार आहे. प्रवेश व तपासणी करण्याचे विशेष अधिकार.

१३. (१) जो कोणी कलम ३ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेंतील निदेशांचें उल्लंघन करून कोणतेंहि रोपटें किंवा झाड काढून नेईल तो, दोषी ठरविण्यांत आला असतां, पराकाष्ठा २५ रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. शास्ति.

(२) जो कोणताहि भोगवटा करणारा इसम कलम ६, पोट-कलम (१) अन्वयें दिलेल्या नोटिशीचें किंवा कलम ६, पोट-कलम (३) अन्वयें अपिलांत दिलेल्या कोणत्याहि आदेशाचें पालन करण्यांत कसूर करील तो, दोषी ठरविण्यांत आला असतां, पराकाष्ठा २५ रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) जो कोणी कलम १७ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमाच्या उपबंधांचा भंग करील तो, दोषी ठरविण्यांत आला असतां, पराकाष्ठा २५ रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) जेव्हां जेव्हां कोणत्याहि इसमास ह्या अधिनियमान्वयें दोषी ठरविण्यांत आलें असेल तेव्हां तेव्हां, न्यायालयास, ह्या अधिनियमाअन्वयें दिलेल्या शास्तीशिवाय आणखी कलम ८, पोट-कलम (१), कंडिका (अ), (ब) किंवा (क) मध्यें उल्लेख केलेल्या प्रकारचें कोणतेंहि रोपटें किंवा झाड नष्ट करण्याविषयीं आदेश देण्याचा अधिकार आहे.

आणखी इतर शास्ति.

१३-अ. (१) जो कोणी वाजवी सबब नसतां, कलम १२-अ अन्वयें केलेल्या घोषणेनुसार जें कोणतेंहि साहाय्य किंवा काम करण्याविषयीं त्यास फर्माविण्यांत आलें असेल तें फर्माविण्यांत येईल त्या रीतीनें करण्यांत कसूर करील किंवा अशा घोषणेनुसार जें कोणतेंहि काम करण्याविषयीं किंवा न करण्याविषयीं त्यास फर्माविण्यांत आलें असेल तें करण्यांत किंवा न करण्यांत कसूर करील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा पन्नास रुपये दंडाची शिक्षा होईल.

(२) जो कोणी कलम १२-ब अन्वयें दिलेल्या कोणत्याहि आदेशाचें उल्लंघन करील किंवा उक्त कलमाच्या उपबंधांचें उल्लंघन होईल असें कोणतेंहि कृत्य करील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल.

(३) (अ) जो ह्या अधिनियमाच्या उपबंधांअन्वयें किंवा तदनुसार त्यास दिलेले कोणतेहि अधिकार चालवीत असेल किंवा त्याजकडे सोपविलेली कोणतीहि कर्तव्यें बजावीत असेल किंवा ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार किंवा त्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि घोषणांनुसार किंवा दिलेल्या कोणत्याहि आदेशांनुसार किंवा निदेशांनुसार टोळांविरुद्ध केलेल्या किंवा करावयाच्या प्रतिबंधक किंवा परिहारक उपाययोजनांच्या संबंधांत अन्य रीतीनें कोणतीहि वैध कामें पार पाडीत असेल अशा कोणत्याहि अधिकाऱ्यास किंवा इसमास, अथवा

(ब) जो वर सांगितलेल्या कोणत्याहि अशा अधिकाऱ्याच्या किंवा इसमाच्या आदेशांची किंवा निदेशांची अंमलबजावणी करीत असेल किंवा हा अधिनियम किंवा तदन्वयें केलेल्या कोणत्याहि घोषणा किंवा दिलेले आदेश किंवा निदेश याअन्वयें असलेल्या त्याच्या कर्तव्यास अनुसरून काम करीत असेल अशा कोणत्याहि इसमास,

जो कोणी स्वेच्छेनें अडथळा करील किंवा कोणताहि प्रतिकार करील किंवा त्याच्या कामांत व्यत्यय आणील किंवा अन्यथा हस्तक्षेप करील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कांहीं अपराधांचा इन्साफ करण्यासंबंधीं विशेष कार्य-रीति.

१३-ब. कलम १३-अ खालील अपराधांचा इन्साफ, दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलमें २६२ ते २६५ यांतील उपबंधांस अनुसरून करण्यांत आला पाहिजे.

निरीक्षक व न्यायसहाय्यक यांची नेमणूक.

१४. राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, अशा अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा स्थानिक क्षेत्रांसाठीं निरीक्षक व न्यायसाहाय्यक नेमण्याचा अधिकार आहे.

दाव्यास किंवा इतर वैध कारवायांस मनाई.

१५. (१) ह्या अधिनियमाअन्वयें सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्याबद्दल कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा वैध कारवाई चालणार नाहीं.

(२) ह्या अधिनियमाअन्वयें करावयाचा कोणताहि खटला कलेक्टरच्या पूर्व मंजुरीवांचून किंवा जो अपराध झाला आहे असें म्हणणें असेल तो घडल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांनंतर दाखल करतां कामा नये.

१६. कलम १७ अन्वयें राज्य सरकारास दिलेल्या अधिकारांव्यतिरिक्त या अधिनियमाअन्वयें त्यास दिलेले इतर अधिकार राज्य सरकारास कोणत्याहि अधिकाऱ्याकडे सोंपवितां येतील. अधिकार सोंपविणें.

१७. (१) राज्य सरकारास ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषेंकरून व वरील उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, असे नियम पुढील सर्व किंवा त्यांपैकीं कोणत्याहि गोष्टींबाबत करतां येतील:—

(१) कलम ५ अन्वयें नोटीस द्यावयाची रीत ;

(२) कलम ११, पोट-कलम (१) अन्वयें चौकशी करण्याची रीत ;

(२अ) कलम १२-अ अन्वयें करावयाच्या कामाबद्दल इसमास द्यावयाचें पारिश्रमिक;

(२ब) कलेक्टरच्या आदेशाविरुद्ध कलम १२-क अन्वयें ज्या प्राधिकाऱ्याकडे अपील करतां येईल तो प्राधिकारी आणि अशा अपिलाच्या संबंधांत अनुसरावयाची कार्यरीति ; आणि

(३) ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठीं झाडें व रोपटीं यांची किंमत ठरविण्याची पद्धत.

(३) ह्या कलमाअन्वयें केलेले नियम राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत. परंतु तत्पूर्वी ते आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.

१८. मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग यांबाबत अधिनियम, १९४१ ह्या याअन्वयें रद्द करण्यांत आला आहे. सन १९४१चा मुंबई अधिनियम १४ रद्द करणें.